05 MAR 2025 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दृष्टी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सुगम्य विज्ञान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठाचे समावेशी शिक्षण संसाधन केंद्र आणि यू.जी.सी. स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीझ यांच्या वतीने कोल्हापूर आणि सांगली येथील विविध शाळांत शिकणाऱ्या दृष्टी दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता एकदिवसीय सुगम्य विज्ञान कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविण्यासाठी आणि शालेय अभ्यासक्रमातील प्रयोग करता यावेत यासाठी जीव, भौतिक, रसायन व वनस्पती या शास्त्रांवर आधारित विविध प्रयोग वेगवेगळ्या मॉडेलच्या माध्यमातून प्रत्यक्ष शिकवण्यात आले. यामध्ये विद्यापीठाच्या विविध अधिविभागांतील,



शिवाजी विद्यापीठात आयोजित सुगम्य विज्ञान कार्यक्रमात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्यासह उपस्थितांना सतीश नवले यांनी प्रात्यक्षिके दाखविली.

तसेच राजाराम विद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून दिवसभर उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या माजी प्रमुख डॉ. अंजली निगवेकर, तर समारोपास कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, हे प्रयोग अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत. या प्रयोगांत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होणे गरजेचे आहे.

डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले. प्रकल्प सहायक सतीश नवले यांनी प्रयोग निर्मिती केली.

यावेळी आयक्यूएसी संचालक डॉ. सागर डेळेकर उपस्थित होते. अक्षता बिराजदर यांनी सूत्रसंचालन केले, तर रोहन लाखे यांनी आभार मानले.

कोल्हापूर आणि सांगली येथील विविध शाळांत शिकणाऱ्या दृष्टी दिव्यांग विद्यार्थ्यांचा सहभाग

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 MAR 2025

पुण्यनगरी



लातूर येथे प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांना पुरस्काराने सन्मानित करताना मान्यवर.

# प्रा. महाजन यांना डॉ. शेजवलकर पुरस्कार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांना त्यांच्या वाणिज्य व व्यवस्थापन शिक्षण व संशोधन क्षेत्रातील योगदानाबद्दल महाराष्ट्र कॉमर्स टीचर्स असोसिएशनने त्यांना डॉ. पी. सी. शेजवलकर पुरस्कार देऊन सन्मानित केले. लातूर येथे झालेल्या ३५ व्या महाराष्ट्र वाणिज्य परिषदेत असो.चे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवडे व डॉ. टी. ए. शिवारे यांच्या हस्ते प्रा. महाजन यांचा सन्मान करण्यात आला. या सन्मानाबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 MAR 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून 'सृष्टी संजीवन' राष्ट्रीय परिषद


**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ भूगोल अधिविभाग, इंडियन सोसायटी ऑफ हिटिंग, रेफ्रीजरेटिंग अँड एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स कोल्हापूर चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात दि. ६ व ७ मार्च रोजी 'सृष्टी संजीवन' या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष प्रमोद पुंगावकर, डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पूर, पाणी, प्रदूषण व प्रकाश हे घटक सध्या हवामानातील बदलास कारणीभूत ठरत आहेत. मानवी जीवनावर याचे परिणाम प्रकर्षाने जाणवत आहेत. याची शास्त्रीय दृष्टिकोनातून कारणमीमांसा व उपाययोजना यांचा अभ्यास होणे गरजेचे आहे. या उद्देशाने परिषदेचे आयोजन केले आहे. गुरुवार, दि. ६ रोजी सकाळी दहा वाजता खा. शाहू महाराज यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. महापालिका आयुक्त तथा प्रशासक के. मंजुलक्ष्मी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकियन एस., अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रमोद माने यांची प्रमुख उपस्थिती असेल. परिषदेत विषय तज्ज्ञ व नामवंत विचार मांडणार आहेत. पत्रकार परिषदेला अवेश हुसैनी, रमेश पोवार, योगेश गांधी, अतुल इंगवले, विजय पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 MAR 2025
पुण्यनगरी

# कायद्याच्या उपयोजनात 'एआय'चा समावेश शक्य : डॉ. बंगाली



डॉ. स्वप्नील बंगाली.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कायद्याच्या उपयोजनामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा समावेश शक्य आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ डॉ. स्वप्नील बंगाली यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभामध्ये पीएम-उषा योजनेंतर्गत 'व्हॅल्यू ॲडेड कोर्स ऑन ज्युडिशियल एक्झामिनेशन ट्रेनिंग' या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी विधी अधिविभागाचे प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे होते. दुसऱ्या सत्रात ॲड. संदीप मुतालिक (सांगली) यांनी कामगार न्यायालयाशी संबंधित कायद्यांची सविस्तर माहिती दिली. तिसऱ्या सत्रात डॉ. बंगाली यांनी 'इंटरनेट ऑफ थिंग्स' या विषयावरही मार्गदर्शन केले. चौथ्या सत्रातही त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेविषयी सविस्तर मार्गदर्शन केले व शंका समाधानही केले.

यावेळी डॉ. आर. नारायणा, सुवर्णा कांबळे, अक्षय कोल्हापुरे, आकाश कुंभार, पूजा लोहार, वैष्णवी माळी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 MAR 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून उन्हाळी सत्रातील परीक्षांचे अर्ज भरण्यास १० मार्चपर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील मार्च-एप्रिलच्या उन्हाळी सत्रामध्ये होणाऱ्या पदवी परीक्षेचे परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ दिली आहे. विद्यार्थ्यांना १० मार्चपर्यंत विनाविलंब शुल्क भरता येणार आहे. विलंब शुल्कासह ११ ते १३ मार्च तर अतिविलंब शुल्कासह १८ मार्चपर्यंत अर्ज करता येणार आहे. विद्यापीठाकडे परीक्षा अर्जाच्या याद्या १५ ते २१ मार्च दरम्यान जमा करावयाच्या आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 MAR 2025

लोकमत

# परीक्षा अर्ज भरण्यास १० मार्चपर्यंत मुदतवाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील मार्च/एप्रिल उन्हाळी सत्रामध्ये होणाऱ्या पदवी परीक्षेचे परीक्षा अर्ज भरण्यास १० मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. उन्हाळी सत्रामध्ये होणाऱ्या पदवी परीक्षेचे परीक्षा अर्ज २१ फेब्रुवारीपासून भरण्यास सुरुवात झाली आहे.

१० मार्चपर्यंत विनाविलंब अर्ज भरता येतील. ५० रुपयांच्या विलंब शुल्कासहित ११ ते १३ मार्चपर्यंत विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याची मुभा आहे. तर अतिविलंब शुल्कासहित १४ ते १८ मार्चपर्यंत विद्यार्थी अर्ज भरू शकतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 MAR 2025
सकाळ

# विद्यापीठाच्या पदवी परीक्षेचा अर्ज भरण्यास मुदतवाढ

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ४ : मार्च-एप्रिल या उन्हाळी सत्रात होणाऱ्या पदवी परीक्षेचा अर्ज भरण्यास शिवाजी विद्यापीठाने मुदतवाढ दिली. याअंतर्गत विनाविलंब शुल्कासह अर्ज करण्यास दहा मार्चपर्यंत मुदत आहे. कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेतील पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा पदव्युत्तर अधिविभागामध्ये परीक्षा अर्ज विलंब शुल्कासहित भरण्याची मुदत ११ ते १३ मार्च दरम्यान असणार आहे. अतिविलंब शुल्कासमवेत अर्ज भरण्यासाठी मुदत १४ ते १८ मार्चपर्यंत आहे. विद्यार्थी हितास्तव या परीक्षांचे अर्ज भरण्यास मुदतवाढ दिली आहे. या उन्हाळी सत्रात विविध अभ्यासक्रमांच्या सुमारे आठशे परीक्षा होणार आहेत. हिवाळी सत्रामध्ये झालेल्या ७८८ परीक्षांचे निकाल आतापर्यंत जाहीर केल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

05 MAR 2025 सकाळ जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवस्पंदन महोत्सवात तंत्रज्ञान अधिविभागाची चमक

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवामध्ये गतवर्षीप्रमाणेच यंदाही तंत्रज्ञान अधिविभागाच्या क्रीडापटूंनी विविध स्पर्धांत चमक दाखविली.

काल स्पर्धेच्या उद्घाटन समारंभानंतर आज बुद्धिबळासह बॅडमिंटन स्पर्धेत तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. अधिविभागाच्या धैर्यशील सरनोबतने बुद्धिबळ पुरुष गटात, तर प्रतीक्षा गोसावीने महिला गटात प्रथम क्रमांक मिळविला. बुद्धिबळ पुरुष गटात अर्थशास्त्र अधिविभागाच्या अभिजित खोपकरने द्वितीय, तर क्रीडा अधिविभागाच्या राहुल लोखंडेने तृतीय क्रमांक मिळविला. महिला गटात समाजशास्त्राच्या स्नेहल खामकरने द्वितीय, तर गणितशास्त्रच्या गीता पांढरेने तृतीय क्रमांक मिळविला.

## आज (बुधवार) होत्सवात

■ क्रिकेट (पुरुष व महिला), कबड्डी (पुरुष व महिला), बास्केटबॉल (पुरुष व महिला), व्हॉलीबॉल (पुरुष) तसेच ॲथलेटिक्स (महिला व पुरुष) स्पर्धा होणार आहेत.

पुरुष बॅडमिंटनचीही आज अंतिम फेरी झाली. यामध्ये तंत्रज्ञान अधिविभाग, अर्थशास्त्र अधिविभाग आणि जैव तंत्रज्ञान अधिविभाग यांनी अनुक्रमे क्रमांक पटकावले. पुरुषांच्या क्रिकेट स्पर्धेत आज यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, एम.बी.ए., इतिहास, कॉम्प्युटर सायन्स, क्रीडा अधिविभाग, रसायनशास्त्र या अधिविभागांनी प्रतिस्पर्धी संघांवर विजय मिळवित पुढील फेरीत प्रवेश केला, तर महिला क्रिकेट स्पर्धेत यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, इतिहास, तंत्रज्ञान, भौतिकशास्त्र, पर्यावरणशास्त्र, नॅनो सायन्स, गणितशास्त्र, राज्यशास्त्र, प्राणिशास्त्र या अधिविभागांनी पुढील फेरीत प्रवेश केला. पुरुषांच्या कबड्डी स्पर्धेत इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, क्रीडा अधिविभाग, ए.जी. पी. एम., संगणकशास्त्र, भौतिकशास्त्र या अधिविभागांनी पुढील फेरीत प्रवेश केला.



**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी शिवस्पंदन क्रीडा महोत्सवात कबड्डी स्पर्धेतील सामने रंगले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 MAR 2025

लोकमत

# शिवस्पंदन क्रीडा स्पर्धेत तंत्रज्ञान अधिविभागाची चमक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सव २०२४-२५मध्ये गतवर्षीप्रमाणेच यंदाही तंत्रज्ञान अधिविभागाच्या क्रीडापटूंनी विविध स्पर्धांत चमक दाखविण्यास सुरुवात केली.

मंगळवारी तंत्रज्ञान अधिविभागाच्या धैर्यशील सरनोबतने बुद्धिबळ पुरुष गटात तर प्रतीक्षा गोसावीने महिला गटात प्रथम क्रमांक मिळविला. बुद्धिबळ पुरुष गटात अर्थशास्त्र अधिविभागाच्या अभिजित खोपकरने द्वितीय, तर क्रीडा अधिविभागाच्या राहुल लोखंडेने तृतीय क्रमांक मिळविला. महिला गटात समाजशास्त्राच्या स्नेहल खामकरने द्वितीय, तर गणितशास्त्रच्या गीता पांढरेने तृतीय क्रमांक मिळविला. पुरुष बॅडमिंटनमध्ये तंत्रज्ञान अधिविभाग, अर्थशास्त्र अधिविभाग आणि जैव तंत्रज्ञान अधिविभाग यांनी अनुक्रमे क्रमांक पटकावले.

**कबड्डी स्पर्धेत इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, संगणकशास्त्र, भौतिकशास्त्र विभाग पुढील फेरीत**

पुरुषांच्या क्रिकेट स्पर्धेत यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, एम.बी.ए., इतिहास, कॉम्प्युटर सायन्स, क्रीडा अधिविभाग, रसायनशास्त्र आदिंनी पुढील फेरीत प्रवेश केला. तर, महिला क्रिकेट स्पर्धेत यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, इतिहास, तंत्रज्ञान, भौतिकशास्त्र, पर्यावरणशास्त्र आदि विभागांनी पुढील फेरीत प्रवेश केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 MAR 2025

तरुण भारत

# तंत्रज्ञान अधिविभागाची 'शिवस्पंदन' स्पर्धेत चमक

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सव २०२४-२५मध्ये गतवर्षीप्रमाणेच यंदाही तंत्रज्ञान अधिविभागाच्या क्रीडापटूंनी विविध स्पर्धांत चमक दाखविण्यास सुरवात केली आहे.

बुद्धीबळासह बॅडमिंटन स्पर्धेत तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केले. या अधिविभागाच्या धैर्यशील सरनोबतने बुद्धिबळ पुरूष गटात तर प्रतीक्षा गोसावीने महिला गटात प्रथम क्रमांक मिळविला. बुद्धीबळ पुरूष गटात अर्थशास्त्र अधिविभागाच्या अभिजीत खोपकरने द्वितिय, तर क्रीडा अधिविभागाच्या राहुल लोखंडेने तृतीय क्रमांक मिळविला. महिला गटात समाजशास्त्राच्या स्नेहल खामकरने द्वितिय तर गणितशास्त्रच्या गीता पांढरेने तृतीय क्रमांक मिळविला. पुरूष बॅडमिंटनचीही अंतिम फेरी झाली. यामध्ये तंत्रज्ञान अधिविभाग प्रथम, अर्थशास्त्र अधिविभाग द्वितीय आणि जैव तंत्रज्ञान अधिविभाग तृतीय क्रमांक पटकावला. पुरूषांच्या क्रिकेट स्पर्धेत आज यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, एम. बी.ए., इतिहास, कॉम्प्युटर सायन्स, क्रीडा अधिविभाग, रसायनशास्त्र या अधिविभागांनी प्रतिस्पर्धी संघांवर विजय मिळवित पुढील फेरीत प्रवेश केला. तर, महिला क्रिकेट स्पर्धेत यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, इतिहास, तंत्रज्ञान, भौतिकशास्त्र, पर्यावरणशास्त्र, नॅनो सायन्स, गणितशास्त्र, राज्यशास्त्र, प्राणीशास्त्र या अधिविभागांनी पुढील फेरीत प्रवेश केला. पुरूषांच्या कबड्डी स्पर्धेत इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, क्रीडा अधिविभाग, ए. जी. पी. एम., संगणकशास्त्र, भौतिकशास्त्र या अधिविभागांनी पुढील फेरीत प्रवेश केला.